जय शिवराय एज्युकेशन सोसायटी,मुरगूड संचलित



# झेप

कॉलेज विश्वातील एक विश्वसनीय अनियतकालिक

## सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,मुरगूड

• संस्थापक : मा.खास.सदाशिवराव मंडलिक
• संपादक : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे
• कार्यकारी संपादक : प्रा. सुशांत पाटील
• सहाय्यक : डॉ. सुखदेव एकल, डॉ. सोनाली कुंभार

• वर्ष १६ वे • मार्च २०२६ • पाने सहा • स्वागतमूल्य १ रुपये पान नं.१

# लोकनेत्याच्या संघर्षातील खंबीर साथ : स्वर्गीय सौ. विजयमाला मंडलिक



## ४५ व्या स्मृतिदिनानिमित्त

**मुरगूड (वार्ताहर) :**

निःस्वार्थी, त्यागपूर्वक जनतेची सेवा करून आपले आयुष्य खडतरपणे घालविणाऱ्या, लोकनेत्याच्या संघर्षाला खंबीर साथ देणाऱ्या स्वर्गीय सौ. विजयमाला सदाशिवराव मंडलिक यांचा ४५ वा स्मृतिदिन विविध कार्यक्रमांनी साजरा होत आहे.

कोल्हापूरात (राजारामपुरी) श्री. रामचंद्र मोरे या सामान्य कुटूंबात विजयमालाबाईंचा जन्म झाला. त्यांचा खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्याशी १९ मे १९६३ रोजी विवाह झाला. तेव्हापासून खासदार मंडलिक यांच्या व्यापक समाजहिताच्या कार्यात त्या सतत कार्यरत राहिल्या. प्रारंभीच्या काळात मुरगूड येथील खासदार मंडलिक यांनी स्थापन केलेल्या जय शिवराय एज्युकेशन संस्थेच्या शिवराज हायस्कूलमध्ये हिंदी विषयाच्या शिक्षिका म्हणून त्यांनी ज्ञानदानाचे सेवाभावी काम केले. शाळेतील मुलांच्या सहवासात त्या सूर्यविकासी कमळाप्रमाणे आपोआप उमलून हसू लागत. बाईना पाहून शाळेतील मुला-मुलींना आपली आई भेटल्याचा आनंद होई. शाळेतील सर्व मुले हृदयाची कवाडे उघडून आपल्या कौटुंबिक जीवनातील सुख-दुःखाच्या, घरच्या परिस्थितीच्या मनमोकळे स्वच्छंदीपणाने त्यांच्याशी हितगुज करीत असत. बाईंचा विषय हिंदी जरी असला तरी मराठीतील कवी 'यशवंत' यांची 'आई' ही कविता त्या फार तन्मयतेने शिकवत असत. गोरगरीब मुला-मुलींनी शिकले पाहिजे, असा त्यांचा ध्यास होता. बाईंच्या अध्यापनाचा अनुभव घेतलेले अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी बाईंच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याबद्दल आजही भरभरून कौतुकाने सांगतात.

लोकनेते खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक सुख-दुःखांच्या खडतर परिस्थितीमध्ये बाईंनी आपल्या मनाचा तोल ढळू दिला नाही. कागल तालुक्याच्या अनेक गावागावात पायी फिरून बाईंनी मंडलिक साहेबांचा प्रचार केला. मंडलिक साहेबांच्या पुरोगामी, ध्येयवादी, स्पष्टवक्तेपणा, स्वच्छ चारित्र्य, जिद्दी, लढाऊ, स्वाभिमानी आणि जनसामान्यांबद्दल प्रचंड तळमळ या सर्व चांगल्या गुणांच्या प्रेरणास्थानी बाईच होत्या. साहेबांच्या खडतर जीवन प्रवासात विजयमालाबाईंचा फार मोठा आधार होता. बाईंनी स्वच्छ मनाच्या सदाशिवराव मंडलिक यांच्या बरोबर अपार कष्ट करून निष्ठेने संसार केला. साहेबांचा ध्येयवाद आणि स्वाभिमान बाईंनी जपला. सुख-दुःखाचे प्रसंग येऊनही मुरगूडच्या वातावरणाशी, इथल्या मातीशी, सामान्य जनतेशी बाईंचे अतूट जिव्हाळ्याचे नाते होते. पण नियतीला हे मान्य झाले नाही. हसत खेळत आपल्या साहेबांच्या, मुलांच्या समवेत भरला संसार करणाऱ्या बाईंचा दुर्दैवाने मंगळवार दि. ३१ मार्च १९८१ रोजी मृत्यु झाला. कागल तालुक्यात प्रत्येक गावा गावात हळहळ व्यक्त झाली. जिल्ह्यातील मंडलिक साहेबांच्यावर प्रेम करणारी सामान्य माणसे दुःखी झाली. अंत्यसंस्कारावेळी प्रचंड जनसमुदायाला आपल्या घरातील आई गेल्याचं दुःख झालं. प्रत्येकाच्या डोळ्यातून आसवं गळू लागली.

बाईंच्या मुलांच्या निरागस चेहऱ्याकडे पाहून माणसांच्या डोळ्यातून आसवांचे झरे वाहू लागले. साहेबांनाही फार दुःख झाले. साहेबांची मुले आईविना पोरकी झाली. भरला संसार सोडून आई देवाघरी गेली. आई ही मायेची सावली असते, वात्सल्याचा सागर असते, तिच्या कुशीतच बालपणीच्या पंखांना उडण्याचे बळ येते. कर्तृत्वाला बहर येतो हे खरे असले तरी मुलांना आईच्या मायेची, तिच्या वात्सल्याची गरज होती,तेव्हाच आई मुलांना सोडून गेली. या काळात या दुःखी वातावरणाशी व भावजीवनाशी एकरूप होऊन खा. मंडलिक साहेबांनी सर्वांना धीर दिला. साहेबांची कन्या सुजाता जाधव (दिदी) यांचा या लहान भावंडांना वाढविण्यामध्ये मोठा सिंहाचा वाटा आहे. याकाळात आजोबा, आजींचाही मानसिक आधार, माया व सहवास त्यांना मिळाला होता. विजयमालाबाईंच्या प्रेरणा अदृश्य रूपाने साहेबांच्या वर्तमान जीवन प्रवाहाला खंबीरपणे साथ देत होत्या. बाईंची भावमूर्ती, इच्छापूर्ती, त्यांचा मुलगा मा. खासदार प्रा. संजय मंडलिक, मुली, सून, नातवंडाच्या जीवनातून आजही अदृश्यरूपाने दिसून येत आहेत. बाईंच्या स्मृतिदिनी आजही तालुक्यातील गोरगरीब लोक दुःखी होतात, हळहळ व्यक्त करतात. आज आमच्या माता विजयमाला बाई पाहिजे होत्या. हे सगळे वैभव त्यांनी पाहिले असते,अशी आर्त कळकळ सामान्य माणसं बोलून दाखवतात.

आजच्या वर्तमान जीवनातील राजकीय नेत्यांच्या जीवनामध्ये डोकावत असताना थोडं थांबावं लागतं. पण विजयमाला मंडलिक आणि खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या वैवाहिक जीवनातील प्रेम-जिव्हाळा पत्नीच्या मृत्यूनंतरही मंडलिक साहेबांनी जपला होता. शुद्ध, निष्कलंक, आदर्श चारित्र्याचा उत्तम नमुना म्हणून आज महाराष्ट्रातील अनेक नेते, युवक, कार्यकर्ते दिवंगत खासदार मंडलिक साहेबांच्या जीवनप्रवासाकडे पाहतात. विजयमालाबाईंच्या मुली सुजाता, सुस्मिता व सुनेत्रा, मुलगा मा.खासदार प्रा.संजयदादा मंडलिक व सून सौ.वैशाली मंडलिक, नातवंडे ॲड. विरेंद्र, यशोवर्धन, समरजीत मंडलिक हे आजही बाईंचे आणि साहेबांचे शैक्षणिक व समाजकार्य निरपेक्ष वृत्तीने करीत आहेत. सामान्यांच्या हितासाठी जनसामान्यांबद्दलचे प्रेम, जिव्हाळा जोपासणे हिच खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली ठरेल.

सय येते आम्हा आनंदाच्या क्षणी तुमची |
पापण्यांत गोठविते आम्ही नदी आसवांची ||

स्वर्गीय विजयमालाबाईंच्या पवित्र स्मृतीस मनःपूर्वक अभिवादन.

-डॉ.शिवाजी होडगे
प्राचार्य

# शेतकऱ्यांच्या घरात शिक्षण पोहचण्यासाठी स्व. खा. सदाशिवराव मंडलिक आयुष्यभर प्रयत्नशील : डॉ. राजन गवस



कारखाना कार्यस्थळावर मंडलिक साहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करताना विद्यमान चेअरमन मा. खासदार संजयदादा मंडलिक, ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, व्हा.चेअरमन आनंदराव फराकटे, संचालक ॲड.विरेंद्र मंडलिक व इतर मान्यवर.


**मुरगूड (वार्ताहर) :**

शेतकऱ्यांच्या घरात शिक्षण गेले पाहिजे आणि शेतकयांच्या हितासाठी सहकार रुजला पाहिजे, यासाठी लोकनेते स्व. खासदार सदाशिवराव मंडलिक साहेब प्रयत्नशील होते. जिल्ह्यातील शेतकरी संघटनेपेक्षा शेतकऱ्यांचा खरा लढा मंडलिक साहेब लढले. कारण शेतकरी हा त्यांचा आत्मा होता आणि शेतकरी हा त्यांचा स्वभाव होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, ख्यातनाम साहित्यिक प्रा.डॉ. राजन गवस यांनी केले.

लोकनेते स्व. सदाशिवराव मंडलिक यांच्या ११ व्या स्मृतीदिनानिमित्त हमिदवाडा (ता. कागल) येथील सदाशिवराव मंडलिक कागल तालुका सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर आयोजित कार्यक्रमात ते मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार व कारखान्याचे चेअरमन प्रा.संजयदादा मंडलिक होते.

या कार्यक्रमास पश्चिम महाराष्ट्र युवासेना निरीक्षक व विद्यमान संचालक ॲड. विरेंद्र मंडलिक, शिवसेना जिल्हाध्यक्ष विजय बलुगडे, शिवसेना तालुकाध्यक्ष सुधीर पाटोळे, आर.डी.पाटील, अरुण जाधव, जीवन साळोखे, बाजीराव गोधडे, उमेश देसाई, एस.व्ही.चौगले, सुहास खराडे, विश्वास कुराडे, प्रकाश पाटील, संभाजी मोरे, शिवानंद माळी, संजय संकपाळ, एन. वाय. पाटील, सर्जेराव पाटील, संचालिका प्रतिभा पाटील, उपनगराध्यक्ष रेखाताई मांगले आणि कारखान्याचे आजी-माजी संचालक, सभासद व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिजिटल व्यापाराला नैतिकता हवी : कुलगुरू डॉ.गोयल



कॉमर्स विभागाच्या वतीने आयोजित एकदिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. मदन मोहन गोयल (हरियाणा), ॲड.विरेंद्र मंडलिक, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

डिजिटल कॉमर्स व ई बिझनेस ही केवळ तांत्रिक प्रगती नसून त्याला नैतिक अधिष्ठान देणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन प्रमुख वक्ते कुलगुरू प्रा. डॉ. मदन मोहन गोयल (हरियाणा) यांनी केले. मुरगूड येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. यावेळी सत्राध्यक्ष प्रा. डॉ. विजय काकडे, तसेच प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे, प्रा. डॉ. केदार मरुळकर, प्रा. डॉ. जी ज्ञानचंद्रन, श्रीलंका आणि प्रा. डॉ. एन एल कदम यांनी सखोल मार्गदर्शन केले. ही परिषद प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. डॉ. होडगे यांनी महाविद्यालयाचे मूल्याधिष्ठित शैक्षणिक कार्य सामाजिक बांधिलकी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीची बांधिलकी अधोरेखित केली.

उद्घाटन प्रसंगी जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष ॲड. विरेंद्र मंडलिक यांनी डिजिटल व्यापारामुळे शिक्षण उद्योग व समाजाला नव्या संधी उपलब्ध होत असल्याचे तंत्रज्ञानासोबत नैतिकता व सामाजिक जबाबदारी जोपासण्यावर भर दिला. डॉ. विजय काकडे यांनी B2B, B2C, B2G, CEE@ डेल्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, डेटा गोपनीयता तसेच ग्रामीण बाजारपेठातील संधी यावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. उदय कुमार शिंदे यांनी ई-कॉमर्स मधील भविष्यातील प्रभाव व AI, IOT, AR/VR, ब्लॉग चेन या तंत्रज्ञानांची माहिती दिली. प्रा. डॉ. केदार मरुळकर यांनी सायबर सुरक्षा व ग्राहक विश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रा. डॉ. जी. ज्ञानचंद्रन यांनी आपत्तींचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम व शाश्वत विकासाची गरज मांडली. प्रा. डॉ. एन.एल. कदम यांनी कोविड नंतरच्या डिजिटल परिवर्तनावर सविस्तर भाष्य केले. परिषदेसाठी ११० हून अधिक शोधलेख प्राप्त होऊन विविध तांत्रिक सत्रामध्ये त्यांचे सादरीकरण करण्यात आले. परिषदेचे आयोजन डॉ. एम एस पाटील, लेफ्टनंट प्रा. विनोदकुमार प्रधान यांनी कन्व्हेनर म्हणून काम केले व डॉ. जी आय सामंत, प्रा. एस.वि.मोहिते, प्रा.आर.एल.बोटे व डॉ. सोनाली कुंभार आणि प्रा.विनायक माने यांच्या सहकार्याने पार पडले.

## गारगोटी स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांच्या स्मृती आजही चिरंतन : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे



राज्यशास्त्र विभागाच्या वतीने १३/१२/१९४२ च्या गारगोटी कचेरी हल्ल्यातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ उभारलेल्या क्रांतीज्योतीला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, प्रा.डी.व्ही.गोरे, प्रा. सुशांत पाटील, प्रा. सुहास गोरुले, डॉ.डी.डी.खतकर व इतर प्राध्यापक वृंद.

**मुरगूड (वार्ताहर) :**

१३/१२/१९४२ च्या गारगोटी स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांच्या स्मृती आजही चिरंतन असल्याचे प्रतिपादन सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी केले. ते महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

प्राचार्य होडगे पुढे म्हणाले की, आजच्या युवा पिढीला हा गारगोटीचा रणसंग्राम समजावा, त्यांच्यापर्यंत हा इतिहास पोहोचवा त्याचबरोबर या लढ्यातील क्रांतिकारकांच्या त्यागाची आठवण सतत राहावी या उद्देशाने आजचा हा हुतात्मा दिन साजरा होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी हुतात्म्यांच्या स्मृती ज्योतीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सर्वांचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. सुशांत पाटील यांनी केले. ते म्हणाले की,१९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात मुरगूड व परिसरातील हु.नारायण वारके, हु.तुकाराम भारमल, हु.शंकरराव इंगळे, हु.करवीरय्या स्वामी, हु.मल्लू चौगुले, हु.बळवंत जबडे, हु.परशुराम साळुंखे यांनी देशासाठी हौतात्म्य पत्करले. या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ गारगोटी येथे सात पाकळ्यांचे भव्य स्मारक उभारलेले आहे. हे स्मारक आजही तरुण पिढीला नवीन स्फूर्ती देत असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी प्रा.डी.पी.साळुंखे, प्रा.अशोक पाटील, प्रा.बी.के.सारंग, प्रा. सुहास गोरूले आणि एनएसएसचे स्वयंसेवक निलेश पाटोळे,आदर्श जाधव,महेश सुतार, विशाल कांबळे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय हेरवाडे यांनी केले तर आभार प्रा.डी.व्ही.गोरे यांनी मानले.

## समाजशास्त्र विभागामार्फत भित्तिपत्रकाचे उद्घाटन




'महिला सक्षमीकरण' या भित्तीपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी प्रा.डॉ. गोपाळ गुरू, माजी प्राचार्य डॉ. जयंत कळके, प्रा.डॉ.संजय कोळेकर, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे व इतर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे औचित्य साधून समाजशास्त्र विभागामार्फत 'महिला सक्षमीकरण' या विषयावरील भित्तिपत्रकांचे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. भित्तिपत्रकाचे उद्घाटन जे.एन.यु. दिल्लीचे प्रो. डॉ. गोपाळ गुरु यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा. डॉ. संजय कोळेकर, माजी प्राचार्य डॉ. जयंत कळके, अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. डी. ए. सरदेसाई, समाजशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ. दिपाली सामंत, प्रा. मनीषा पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनी स्वाती मगदूम, ऐश्वर्या, साक्षी पाटील, सानिका मोरे, सुमय्या शेख, मलप्रभा निलजकर, पूजा माने, गौरी परीट यांनी भित्तिपत्रक बनवण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. स्वाती मगदूम या विद्यार्थिनींनी केले. अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी आभार मानले.

## महिला कर्मचाऱ्यांसाठी 'आर्थिक साक्षरता' प्रशिक्षण संपन्न




**मुरगूड (वार्ताहर) :**

महाविद्यालयातील युवती विकास मंच आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती यांनी दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी "महिला सक्षमीकरणासाठी आर्थिक साक्षरता" या विषयावर सॉफ्ट स्किल प्रशिक्षण कार्यक्रमाचे ऑनलाइन (आभासी) माध्यमातून आयोजन केले.हा प्रशिक्षण कार्यक्रम Excellence Global Skills (SEBI) यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. Excellence Global Skills ही भारतातील एक अग्रगण्य प्रशिक्षण व विकास संस्था असून, कॉर्पोरेट सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण, नेतृत्व विकास, टीम बिल्डिंग आणि प्रेरणादायी व्याख्याने यासाठी प्रसिद्ध आहे. ही संस्था सॉफ्ट स्किल्स, हार्ड स्किल्स (तांत्रिक प्रशिक्षण), तसेच आरोग्य व वेलनेस प्रशिक्षण प्रदान करते.

या प्रशिक्षण कार्यक्रमात खुशबू नेवरा यांनी Excellence Global Skills च्या उद्दिष्टांबद्दल माहिती दिली. SEBI व AMFI यांच्या वतीने व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांसाठी आर्थिक सुदृढता वाढविण्याचा उपक्रम राबविण्याचा त्यांचा उद्देश आहे, असे त्यांनी सांगितले. संस्थांमधील कर्मचाऱ्यांमध्ये आर्थिक जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम नव्याने कामाला लागलेल्या कर्मचाऱ्यांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांसाठी उपयुक्त ठरेल अशा प्रकारे तयार करण्यात आला होता.

संसाधन व्यक्ती खुशबू नेवरा, या Excellence Global Skills च्या संस्थापक असून त्यांनी महिला कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणातून त्यांनी जीवनातील बचतीचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी म्युच्युअल फंड, SIP, शेअर बाजार यांसारख्या विविध बचत योजनांची माहिती दिली.

हा प्रशिक्षण कार्यक्रम जय शिवराय एज्युकेशन सोसायटी, मुरगूड येथील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. एकूण ३८ महिला कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. महिलांना सक्षम बनविण्याचा हा मंचाचा एक प्रयत्न होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला Excellence Global Skills च्या श्रीमती खुशी यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले व संसाधन व्यक्तींचा परिचय करून दिला. हा प्रशिक्षण कार्यक्रम सर्व सहभागींसाठी अत्यंत उपयुक्त ठरला.कार्यक्रमाच्या शेवटी या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. (डॉ.) श्रीमती माणिक पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.

## मयूर मोकाशीची आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड



**मुरगूड (वार्ताहर) :**

येथील जय शिवराय एज्युकेशन सोसायटी संचलित सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयचा तायक्वांदो खेळाडू मयूर मोकाशी याने ८७ किलो खालील वजन गटात कोल्हापूर विभागीय व आंतर विभागीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले., या खेळाडूची सलग दुसऱ्या वर्षी ए. व्ही. विद्यापीठ, जालंधर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूचा सत्कार महाविद्यालयांमध्ये प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे व उप-प्राचार्य डॉ. शिवाजी पोवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर स्टाफ व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. या खेळाडूला उप-प्राचार्य व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांचे मार्गदर्शन लाभले. तर संस्थेचे सेक्रेटरी माजी खासदार प्रा. संजय मंडलिक, कार्याध्यक्ष ॲड. विरेंद्र मंडलिक, अध्यक्ष गजाननराव गंगापुरे, कार्यवाह आण्णासाहेब थोरवत, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे प्रोत्साहन लाभले.

## ऑनलाइन आंतरमहाविद्यालयीन इंग्रजी वाचन स्पर्धेचा निकाल जाहीर



**मुरगूड (वार्ताहर) :**

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाने प्रथमच ऑनलाइन इंटरकॉलेज इंग्रजी वाचन स्पर्धा २०२६ यशस्वीरित्या आयोजित केली. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना त्यांचे वाचन कौशल्य, उच्चार, आवाजाचे नियंत्रण आणि आत्मविश्वास प्रदर्शित करण्यासाठी एक जिवंत व्यासपीठ उपलब्ध झाले. या कार्यक्रमात नामांकित महाविद्यालयांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग दिसून आला.

स्पर्धेचे मूल्यांकन मूल्यांकनकर्त्यांच्या एका सन्माननीय पॅनेलने केले: श्री छत्रपती शहाजी कॉलेज, कोल्हापूर येथील इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ.एन.एस.जाधव,कासेगाव येथील इंग्रजी, कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्रमुख सहाय्यक प्रा. आर. ए. प्रधान; आणि उपक्रमाचे आयोजक लेफ्टनंट प्रा.व्ही.ए.प्रधान. त्यांच्या तज्ञ निर्णयामुळे संपूर्ण कार्यक्रमात निष्पक्षता आणि उच्च शैक्षणिक दर्जा सुनिश्चित झाला.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे आहेत:
प्रथम पारितोषिक: कु.हेमांगी रंगनाथ आजगावकर (बी.टेक. १), डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर द्वितीय पारितोषिक:कु.आफिया रियाज मोमीन (बी.एससी. १), विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर तृतीय पारितोषिक: कु.प्राजक्ता प्रकाश खोचगे (बी.टेक. ३), डॉ.डी.वाय.पाटील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर विजेत्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संपूर्ण आयोजक संघ आणि महाविद्यालयाने त्यांचे मनापासून अभिनंदन केले. प्रा. डॉ. शिवाजी होडगे यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे यश शक्य झाले, तर श्री. सुहास गोरुले यांनी कार्यक्रम सुरळीतपणे आयोजित करण्यासाठी प्रामाणिक सहकार्य केले.

आयोजकांनी जाहीर केले की त्यांनी त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर विजेत्यांची प्रमाणपत्रे ईमेल केली आहेत आणि लवकरच त्यांना त्यांचे बक्षिसे ऑनलाइन मिळतील. आंतर महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेच्या कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि शैक्षणिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



इतिहास विभागामार्फत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, विभागप्रमुख डॉ.पी.आर. फराकटे व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड येथे इतिहास विभागामार्फत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन पर कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एम.होडगे उपप्राचार्य एस.बी. पोवार स्टाफ सेक्रेटरी प्रा.दादासाहेब सरदेसाई NAAC समन्वयक डॉ.एम.एस.पाटील इतिहास विभाग प्रमुख डॉ.पी.आर.फराकटे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ.पी.आर.फराकटे यांनी केले.त्यानंतर महाविद्यालयातील तेजस्विनी एकल, प्रज्ञा कुंभार, आरती गिरीबुवा, वैष्णवी कुंभार या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली.त्यानंतर समाजशास्त्र विभागाच्या डॉ. दिपाली सामंत यांनी सावित्रीबाईंचा संघर्षमय जीवनप्रवास,त्यांचे त्यागमय जीवन त्यांची मेहनत याविषयी आपले मनोगत व्यक्त केले.नंतर लेफ्टनंट विनोद प्रधान यांनी खुमासदार शैलीमध्ये महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख करून दिली.

महाविद्यालयातील NAAC समन्वयक डॉ.एम.एस.पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांचे कार्य व आताच्या सावित्री म्हणजेच महिलांची वास्तव परिस्थिती याविषयी मार्गदर्शन केले.महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस.बी.पवार यांनी सर्व मुलींना सावित्रीबाईंच्या कार्याची ओळख करून देऊन सर्वांनी सावित्रीबाईंच्या भूमिकेत असायला पाहिजे असा संदेश दिला.अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एम.होडगे यांनी सावित्रीबाईंचे कार्य त्यांचा संघर्षमय जीवन प्रवास,लेखन कार्य,समाजकार्य याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. सोहनी,ग्रंथपाल प्रा.सातपुते, प्रा.मनीषा सावेकर, प्रा.अशोक पाटील, प्रा.अवधूत पाटील, प्रा.राजेंद्र पाटील, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अर्चना कांबळे यांनी केले तर आभार प्रा.नितेश रायकर यांनी मानले.

## 'पदवीनंतर नोकरीच्या संधी' या विषयावर कार्यशाळा संपन्न



कार्यशाळेत मार्गदर्शन करताना आयसीए एज्यू. स्किल्सच्या डायरेक्टर वेदा कोरोचे, उपस्थित प्राचार्य डॉ शिवाजी होडगे व अन्य मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी पदवीनंतर उपलब्ध होणाऱ्या विविध करिअर संधींबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने वाणिज्य विभाग व ICA EDU स्किल्स कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे होते.

यावेळी ICA चे डायरेक्टर वेदा कोरोचे, सिनियर फॅकल्टी अश्विनी चौगले तसेच कौन्सिलर सीमा नरसगोंडा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अस्विनी चौगले यांनी अकाउंटिंग, टॅक्सेशन, बँकिंग व कॉर्पोरेट क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर माहिती दिली. वेदा कोरोचे यांनी मुलाखत तंत्र, रेझ्युमे लेखन व व्यक्तिमत्त्व विकास तसेच SAP, Tally, Adv Excel, AI, GST, TDS याविषयी मार्गदर्शन केले. सीमा नरसगोंडा यांनी कॉमर्स क्षेत्रातील विविध करिअर संधी, उच्च शिक्षणाच्या दिशा तसेच योग्य क्षेत्राची निवड कशी करावी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. होडगे सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पदवी शिक्षणानंतर केवळ नोकरीकडे न पाहता कौशल्य विकास, प्रामाणिकपणा व सातत्यपूर्ण प्रयत्न यांना महत्त्व द्यावे, असे सांगितले. तसेच बदलत्या स्पर्धात्मक युगात अद्ययावत ज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास वाणिज्य विभाग प्रमुख लेफ. प्रा. प्रधान सर, प्रा. राहुल बोटे, प्रा. अवधूत पाटील, प्रा. संजय हेरवाडे व प्रा. सोहम डाफळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्वागत व प्रास्ताविक प्रा. संदिप मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन बी.कॉम भाग तीनची विद्यार्थीनी वैष्णवी कुंभार हिने केले तर आभार प्रदर्शन प्रा. स्वप्नील मेंडके यांनी केले.या कार्यशाळेस बी.कॉम व बी.ए. विभागातील मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना पदवीनंतरच्या करिअर संधींबाबत स्पष्ट दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## एनसीसी कॅडेट्स 'अग्निवीर' म्हणून भारतीय सेनेमध्ये चमकले




**मुरगूड (वार्ताहर) :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्स (एनसीसी) युनिटने अग्निवीर योजनेअंतर्गत भारतीय सैन्यात कॅडेट्सची निवड करून पुन्हा एकदा संस्था आणि शहरासाठी अभिमान आणि सन्मान मिळवून दिला आहे. या वर्षी, कॉलेज एनसीसी युनिट अंतर्गत बीएसएफमध्ये कॅडेट रोहन हरी कोंडेकर, CISF मध्ये कॅडेट दीपक शिवाजी पाटील आणि जेयूओ अनुज अनिल एकल, सार्जंट (एसजीटी) शुभम विनायक चौगुले, कॅडेट प्रणव श्रीधर डावरे आणि कॅडेट प्रथमेश प्रमोद गिरीबुवा यांची अग्निवीर म्हणून यशस्वीरित्या निवड झाली आहे, जी विभागासाठी आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे.

गेल्या सहा वर्षांत महाविद्यालयातून सैन्यात सामील होणाऱ्या कॅडेट्सची एकूण संख्या १८ झाली आहे.एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट प्रा. विनोदकुमार प्रधान यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि समर्पित मार्गदर्शनाखाली हे उल्लेखनीय यश मिळाले आहे. त्यांच्या वचनबद्ध नेतृत्व आणि सतत मार्गदर्शनाने कॅडेट्सना देशसेवेसाठी तयार असलेल्या तरुण जवांनामध्ये नागरिकांमध्ये घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. शारीरिक तंदुरुस्ती, चारित्र्य, देशभक्ती आणि नेतृत्व प्रशिक्षणावर त्यांनी भर दिल्याने कॅडेट्सना संरक्षण सेवांमध्ये उत्कृष्टतेचे ध्येय ठेवण्यासाठी सातत्याने प्रेरित केले आहे. महाविद्यालयाचे एनसीसी युनिट केवळ संरक्षण-केंद्रित प्रशिक्षणासाठीच नव्हे तर महाविद्यालय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित केलेल्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागासाठी देखील ओळखले जाते. शिबिरे, सामाजिक जागरूकता कार्यक्रम, साहसी उपक्रम आणि सामुदायिक सेवेद्वारे, एनसीसी विभागाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात आणि संस्थेच्या प्रतिष्ठेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.एनसीसी विभागाच्या यशाला प्राचार्य डॉ. एस. एम. होडगे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचा मोठा पाठिंबा आहे, जे प्रोत्साहन आणि प्रशासकीय पाठिंब्याचे एक भक्कम आधारस्तंभ आहेत.

एनसीसी उपक्रमांबद्दलच्या त्यांच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे कॅडेट्सना त्यांच्या ध्येयांचा पाठपुरावा करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा आणि प्रेरणा मिळते याची खात्री झाली आहे. माननीय प्रा. संजयदादा मंडलिक आणि ॲडव्होकेट वीरेंद्र मंडलिक यांच्या सतत प्रोत्साहन आणि मार्गदर्शनातूनही विभाग प्रेरणा घेतो, ज्यांचे पाठबळ महाविद्यालयातील एनसीसी संस्कृती मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण ठरले आहे.अग्निवीर म्हणून निवड झाल्याबद्दल या कॅडेट्सवर व एनसीसी विभागावर मुरगुड शहरातून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. स्थानिक नागरिक, शैक्षणिक संस्था आणि शुभचिंतकांनी या तरुण सैनिकांच्या कामगिरीबद्दल प्रचंड अभिमान व्यक्त केला आहे आणि त्यांना या भागातील तरुणांसाठी आदर्श म्हणून मानले आहे.

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील एनसीसी विभागाचे सततचे यश राष्ट्र उभारणी आणि युवा सक्षमीकरणाच्या त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. एनसीसीचे ब्रीदवाक्य "एकता आणि शिस्त" हे त्यांच्या ध्येयाचे मार्गदर्शन करत राहिल्याने, येत्या काळात संस्था आणखी अनेक समर्पित सैनिक आणि जबाबदार नागरिक निर्माण करण्यास उत्सुक आहे. पाटील यांच्यासह सर्व एनसीसी कॅडेट्सचा समावेश होता.

## अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने "द दारूचा नाही तर द दूधाचा" कार्यक्रम संपन्न



३१ डिसेंबरचे औचित्य साधून विवेक वाहिनी विभागामार्फत आयोजित "द दारूचा नाही तर द दूधाचा" या विशेष कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य सचिन सुतार.

**मुरगूड (वार्ताहर) :**

३१ डिसेंबर चे औचित्य साधून सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने "द दारूचा नाही तर द दुधाचा" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम.होडगे तसेच उपप्राचार्य डॉ.एस.बी.पोवार, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य सचिन सुतार, विवेक वाहिनी विभाग प्रमुख प्रा.डॉ.पी.आर.फराकटे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला इतिहास विभागाचे प्रा.नितेश रायकर यांनी आध्यात्मिक व ऐतिहासिक उदाहरणे देऊन आजच्या तरुणा मधील व्यसनाधीनतेची समस्या याविषयी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस.बी.पोवार यांनी व्यसन व मोबाईल मुळे होणारे दुष्परिणाम त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे वर्तन, कर्तव्य याविषयी मार्गदर्शन केले.त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एम.होडगे यांनी तरुणांचे आई-वडिलांप्रती असणारे कर्तव्य आपल्या भविष्याबाबत जागरूकता, आपले संकल्प व आपली ध्येय याविषयी बहुमोल असे मार्गदर्शन करून एक चांगला संदेश विद्यार्थ्यांना दिला.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना दूध वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा.अशोक पाटील, प्रा.राजेंद्र पाटील, प्रा.संजय हेरवाडे, प्रा.सोहम डाफळे, प्रा.मनीषा सावेकर, प्रा.दिपाली सामंत व शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अर्चना कांबळे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.पी.आर.फराकटे यांनी मानले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



इतिहास विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एम.होडगे, इतिहास विभाग प्रमुख डॉ.पी.आर.फराकटे व इतर सर्व प्राध्यापक.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड या ठिकाणी इतिहास विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एम.होडगे होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ.पी.आर.फराकटे यांनी केले.कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याती म्हणून महाविद्यालयातील बी.ए.भाग तीन ची विद्यार्थिनी कुमारी प्राची कळमकर उपस्थित होती.या विद्यार्थिनीने आपल्या मनोगतामध्ये शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वीचा इतिहास छत्रपती शहाजीराजे स्वराज्य स्थापना शिवाजी महाराजांचे विविध क्षेत्रातील कार्य याविषयी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एम. होडगे यांनी शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व संभाजी महाराजांचा इतिहास भोसले घराण्याचा इतिहास शिवाजी महाराजांचे विविध क्षेत्रातील कार्य याविषयी बहुमोल असे मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा.अशोक पाटील, प्रा. बाबुराव सारंग,प्रा.राम पाटील,प्रा.धनाजी खतकर,प्रा.सुहास गोरुले,प्रा.सोनाली कुंभार त्याचबरोबर शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अर्चना कांबळे यांनी केले तर आभार प्रा.नितेश रायकर यांनी मानले.

## एक दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन



विशेष मुलांच्या विकासासाठी कार्यरत संस्था 'चेतना विकास मंदिर' या संस्थेस समाजशास्त्र विभागाची भेटी प्रसंगी प्रा.मनिषा सावेकर, डॉ. दिपाली सामंत व सर्व विद्यार्थी.

**मुरगूड (वार्ताहर) :**

दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग आणि युवती विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या अभ्यास सहलीमध्ये प्रामुख्याने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील वि. स. खांडेकर म्युझियम, समाजशास्त्र अधिविभाग, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय मुलांना दाखविण्यात आले. त्यानंतर समाजामध्ये अशी काही विशेष मुले आहेत. त्यांना घडविण्याचे आणि आधार देण्याचे काम कोल्हापूर येथील चेतना विकास मंदिर ही संस्था करते. विद्यार्थ्यांनी तेथील शिक्षकांशी संवाद साधून संस्थेची कार्यपद्धती समजावून घेतली. गतिमंद मुलांशी मनमोकळेपणाने गप्पा मारून त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला. या भेटीमुळे विशेष मुलांकडे बघण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन बदलला.

हातकणंगले तालुक्यातील कुंभोज येथील बाहुबली मंदिर आणि बोट मंदिर दाखविण्यात आले.

## “Employability Skills For Science Graduates Under NEP 2020" या विषयावर एकदिवसीय कौशल्य विकास कार्यशाळा संपन्न





कौशल्य विकास कार्यशाळेत बोलताना बिद्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय पाटील, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, प्रा. सूरज मांगले, प्रा. मयुर कांबळे व इतर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

येथील सदाशिव मंडलिक महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत “Employability Skills For Science Graduates Under NEP 2020" या विषयावर आधारित एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी बिद्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये अंगी लागणाऱ्या मूलभूत कौशल्यांचा सविस्तर आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे सर होते. त्यांनी विद्यार्थ्यांना या कार्यशाळेचे महत्त्व स्पष्ट करत, कौशल्य विकास हा आजच्या स्पर्धात्मक युगात किती आवश्यक आहे हे पटवून सांगितले.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात डॉ. चोपडे सर यांनी Soft Skills व Hard Skills या विषयावर व्याख्यान दिले. तसेच विद्यार्थ्यांकडून विविध कृतियुक्त उपक्रम करून घेत प्रत्यक्ष अनुभव दिला.द्वितीय सत्रात डॉ. व्हनाळकर सर यांनी रोजगारक्षम होण्यासाठी कोणकोणती कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे, यावर सखोल भाष्य केले.तृतीय सत्रात प्राचार्यांच्या हस्ते सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या कार्यशाळेसाठी प्रा.डॉ.शिवाजी पोवार, प्रा.दादासाहेब सरदेसाई, प्रा.डॉ.पांडुरंग फराकटे, प्रा.सुरज मांगले, प्रा.मयूर कांबळे, प्रा. विनायक माने, प्रा.प्रितम गायकवाड, प्रा.सोनाली कुराडे, प्रा. माधुरी कुदळे, प्रा.शिल्पा कुडवे, प्रा.स्नेहा हवालदार, प्रा.आश्विनी गुजर, प्रा. तेजस्विनी कांबळे, प्रा.वैशाली कांबळे, प्रा.समृद्धी मोरे, प्रा.आदिती बांबरे, श्री.सतीश खराडे तसेच अग्रणी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत प्रा. सुरज मांगले यांनी केले, तर प्रास्ताविक प्रा.मयूर कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.हर्षदा पाटील व प्रा.अमृता पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.स्नेहा हवालदार यांनी मानले.सदर कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे महत्त्व समजून घेण्यास मोलाची मदत झाली.

## देश उभारणीसाठी अर्थसंकल्प महत्त्वाचा : प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे



भित्तिपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ.एस बी पोवार, अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी

**मुरगूड (वार्ताहर) :**

अर्थसंकल्प हा देश उभारणीचा भक्कम पाया असून राष्ट्रीय प्रगतीचा दिशादर्शक दस्तऐवज आहे. विद्यार्थ्यांनी अर्थसंकल्प समजून घेतल्यास त्यांची आर्थिक जाणीव प्रगल्भ होते आणि सजग नागरिक घडण्यास मदत होते, असे प्रतिपादन सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे कार्यतत्पर प्राचार्य डॉ शिवाजी होडगे यांनी केले. ते अर्थशास्त्र विभागाच्या वतीने “केंद्रीय अर्थसंकल्प २०२६” या विषयावर तयार करण्यात आलेल्या अभ्यासपूर्ण भित्तीपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

भित्तिपत्रकाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. रघुनाथ ढमकले यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मा. स्वागत परुळेकर, मा. रणजीत नलवडे, मा. महादेव कानकेकर, मा. दादा लवटे, मा. संभाजी मांगले तसेच प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देशाच्या आर्थिक धोरणांचा आणि विकासाच्या आराखड्याचा सखोल परिचय करून देण्याचा उद्देश साध्य करण्यात आला. अर्थशास्त्र विषयाचे अभ्यासक कु. निलेश पाटोळे, कु. आदर्श जाधव, कु. श्रावणी हळदकर व कु. उषा जाधव यांनी अर्थसंकल्पातील महसूली जमा, खर्च, वित्तीय तूट, रोजगार, कृषी आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील तरतुदींचे सोप्या भाषेत प्रभावी सादरीकरण केले. तक्ते, आकृत्या आणि माहितीपूर्ण टिपांच्या साहाय्याने अर्थसंकल्प आकर्षक पद्धतीने मांडण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संजय हेरवाडे यांनी केले. स्वागत प्रा स्वप्निल मेंडके व प्रा. अवधूत पाटील यांनी केले. आभार रामचंद्र पाटील यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा डॉ सोनाली कुंभार यांनी केले.यावेळी प्रा. दीपक साळुंखे, प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा. डॉ. माणिक पाटील,प्रा. डॉ. पांडुरंग फराकटे, प्रा. डॉ हनुमंत सोहनी, प्रा. सुशांत पाटील, प्रा. राहुल बोटे, प्रा. नितेश रायकर, लेफ्ट. विनोद प्रधान, प्रा. धनाजी खतकर, रोहीत परीट उपस्थित होते. महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# एनसीसी विभागातर्फे 'ग्रीटिंग बनाओ, छा जाओ' सर्जनशील स्पर्धेचे आयोजन



**मुरगूड (वार्ताहर) :**

महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाने ३ जानेवारी २०२६ रोजी "ग्रीटिंग बनाओ, छा जाओ" या नाविन्यपूर्ण आणि पर्यावरणपूरक उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केले. महाविद्यालयाच्या विविध विभागातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला आणि त्यांची सर्जनशीलता आणि कलात्मक कौशल्ये दाखवली.

ही स्पर्धा एनसीसी अधिकारी लेफ्टनंट विनोदकुमार प्रधान यांनी डॉ. अशोक पाटील आणि कु. समृद्धी मोरे यांच्या बहुमोल सहकार्याने आयोजित केली. परीक्षक मंडळात डॉ. दिपाली सामंत, सौ. मनीषा पाटील आणि सौ. अर्चना कांबळे यांचा समावेश होता.

"टाकाऊ पासुन टिकाऊ" हे ध्येय समोर ठेऊन विद्यार्थ्यांनी जुन्या साड्या, खराब घरगुती वस्तू, वापरलेल्या खराब कापडी पिशव्या, जुन्या लग्नपत्रिका, मोबाईलचे खराब सिम कार्ड, जून पायथ्याचे बॉक्स आणि इतर टाकाऊ साहित्य यांसारख्या साहित्यांचा वापर करून नाविन्यपूर्ण नवीन वर्षाची शुभेच्छापत्रे तयार केली. सहभागींनी दाखवलेल्या कौशल्य आणि सर्जनशीलतेने परीक्षक प्रभावित झाले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांची सर्जनशील प्रक्रिया, लागलेला वेळ, आलेला खर्च आणि ग्रीटिंग बनविण्यापाठीमागचे प्रेरणा विचारली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मोबाईल फोनपासून दूर राहून त्यांचे मन सर्जनशील विचारात गुंतवून घेण्यास प्रोत्साहन मिळाले. परीक्षक डॉ. सामंत आणि सौ. पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि भविष्यातील स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

सदर स्पर्धकांनी तयार केलेली शुभेच्छापत्रे महाविद्यालयाच्या काच फलकात प्रदर्शित करण्यात आली. ५ जानेवारी २०२६ रोजी प्राचार्य डॉ. एस. एम. होडगे यांनी या प्रदर्शनाचे उद्घाटन केले. डॉ. अशोक पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर एएनओ लेफ्टनंट प्रधान यांनी कार्यक्रमाची उद्दिष्टे आणि यश स्पष्ट केले. अशा अर्थपूर्ण आणि सर्जनशील उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल प्राचार्यांनी एनसीसी विभागाचे कौतुक केले आणि येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांना सहभाग वाढवण्याचे आवाहन केले.

बी.कॉम. भाग ३ ची कु. विद्यार्थिनी वैष्णवी कुंभार हिने टाकाऊ सिम कार्ड वापरून शुभेच्छापत्र तयार करण्याचा तिचा अनुभव सांगितला. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल तिने आयोजकांचे व उपस्थित सर्वांचे एनसीसी विभागाच्या वतीने आभार मानले.

स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे आहेत:
प्रथम: कु. वैष्णवी बाजीराव कुंभार (बी.कॉम. भाग ३)
द्वितीय: प्रतीक्षा राजेंद्र परीट (बी.एससी. भाग ३) तृतीय पारितोषिक: कु. अनुराधा सदाशिव मोहिते (बी.कॉम. भाग ३) विजेत्यांना वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमाणपत्रे आणि बक्षिसे देऊन सन्मानित केले जाईल, तर सर्व सहभागींना एनसीसी विभागाकडून सहभाग प्रमाणपत्रे दिली जातील.

# आंतरमहाविद्यालयीन अर्थशास्त्रीय आकृती रांगोळी स्पर्धा संपन्न


स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, प्रा. डी ए. सरदेसाई, प्रा. व्ही. ए. प्रधान, डॉ. गुरुनाथ सामंत, डॉ. सोनाली कुंभार, प्रा. संजय हेरवाडे.

**मुरगूड (वार्ताहर) :**

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन अर्थशास्त्रीय आकृती रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे कार्यतत्पर प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत, "अर्थशास्त्रातील संकल्पना अशा अभिनव उपक्रमांतून अधिक प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतात," असे प्रतिपादन केले. अर्थशास्त्रासारख्या संकल्पनात्मक विषयाला सर्जनशीलतेची जोड देणाऱ्या या अनोख्या स्पर्धेला विविध महाविद्यालयातून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि कलात्मक कौशल्याचा उत्कृष्ट आविष्कार सादर करत राष्ट्रीय उत्पन्न, मागणी – पुरवठ्याचा सिद्धांत, रोकता सापळा, शाश्वत विकास, दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक वृद्धी व विकास यासारख्या आर्थिक संकल्पना रांगोळ्यांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडल्या. रंग, रेषा आणि आकृत्यांच्या संगमातून अर्थशास्त्राची गुंतागुंतीची तत्वे सहज समजावीत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. डी.आर.माने महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु.सारिका सदाशिव मिसाळ हिने प्रथम क्रमांक, सदाशिव मंडलिक महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु.श्रावणी रवींद्र हळदकर द्वितीय तर कु.सारिका पांडुरंग पाटील व कु. गायत्री महादेव पवार यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. स्पर्धेतील सर्व विजेते व सहभागी विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा संजय हेरवाडे, प्रा दादासाहेब सरदेसाई, लेफ्ट विनोदकुमार प्रधान यांनी काम पाहिले. या स्पर्धेचे यशस्वी संयोजन अर्थशास्त्र विभागातील डॉ गुरुनाथ सामंत, डॉ सोनाली कुंभार,प्रा अवधूत पाटील, प्रा स्वप्निल मेंडके, प्रा रामचंद्र पाटील यांनी केले.

# कविता म्हणजे मानवी मनाच्या सुखदु:खाचे प्रतिबिंब -प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे



काव्यवाचन स्पर्धेच्या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, प्रा. सुखदेव एकल, प्रा. राजेंद्र पाटील, प्रा.सोहम डाफळे व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

मराठी भाषेच्या संवर्धनात कवितेचा वाटा बहुमोल आहे .मानवाच्या सुखदु:खात कविता त्याची सोबती बनत गेली म्हणूनच तिचे प्रतिबिंब काव्यात उतरत गेल्याचे दिसून येत आहे असे प्रतिपादन सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त मराठी विभागाचे वतीने आयोजित केलेल्या 'मराठी भाषा काव्यवाचन स्पर्धा'या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये अनुक्रमे, प्रथम- स्वाती मगदूम,द्वितीय- मलप्रभा निलजकर, तृतीय -प्रथमेश एरुडकर व उत्तेजनार्थ- श्रद्धा सुतार तर प्राध्यापकांच्या मधून प्रथम- प्रा. सुहास गोरूले,द्वितीय -प्रा.दीपक साळुंखे, तृतीय- प्रा.अर्चना कांबळे यांनी पारितोषिक प्राप्त केली . विजेत्या स्पर्धकांना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते ग्रंथ भेट देण्यात आली.सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत २८ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्वागत व प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सुखदेव एकल यांनी केले या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ.शिवाजी पोवार, NAAC समन्वयक डॉ.माणिक पाटील, लेफ्टनंट विनोदकुमार प्रधान, प्रा. दादासाहेब सरदेसाई ,प्रा.पी.आर.फराकटे, प्रा. दिगंबर गोरे, प्रा. स्वप्निल मेंडके, प्रा. मनीषा पाटील,प्रा. बाबुराव सारंग उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.आर.एस.पाटील तर आभार प्रा. सोहम डाफळे यांनी मानले.

# योग्य मार्गाचा स्वीकार ही आनंदाची गुरुकिल्ली" डॉ. समरजिता थोरात



"एकविसाव्या शतकातील स्त्रियांसमोरील आरोग्यविषयक व औद्योगिक संधी आणि आव्हाने" या विषयावर अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत आयोजित कार्यशाळेत बोलत असताना डॉ. समरजिता थोरात

**मुरगूड (वार्ताहर) :**

आयुष्यामध्ये योग्य मार्गाचा अवलंब केल्यास आयुष्य आनंदी होईल असे प्रतिपादन डॉ. समरजिता थोरात यांनी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड मधील युवती विकास मंच आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत , "एकविसाव्या शतकातील स्त्रियांसमोरील आरोग्यविषयक आणि औद्योगिक आव्हाने व संधी" या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेमध्ये केले.

कार्यशाळेच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने कार्यशाळेचे उद्घाटन देवचंद महाविद्यालय अर्जुन नगर च्या प्राचार्य मा. डॉ. जी.डी. इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर युवती विकास मंचच्या अध्यक्ष प्रा. डॉ. सौ माणिक पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उद्घाटक म्हणून बोलत असताना प्राचार्य डॉ.इंगळे यांनी उपस्थित अभ्यागताना आपल्या आरोग्याची व्यवस्थितरित्या काळजी घ्यावी असे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्षेत्रामध्ये पारंगत होऊन स्व कर्तुत्वावर आपल्या पायावर उभे राहावे असे मार्गदर्शन केले. उद्घाटनाच्या सत्रामध्ये आभार प्रदर्शन अग्रणी महाविद्यालय योजनेचे समन्वयक प्रा. डी.ए. सरदेसाई यांनी केले.प्रथम सत्रामध्ये स्वागत प्रास्ताविक व परिचय डॉ. दिपाली सामंत यांनी केले.

बीजभाषक म्हणून बोलत असताना मा. डॉ. समरजीता थोरात यांनी युवतींना विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की स्त्रियांना जन्माला आल्यापासूनया बालवयामध्ये, तारुण्यांमध्ये, उतरत्या वयामध्ये, सर्व ठिकाणी आव्हाने भरलेली आहेत. पण त्या आव्हानांना धैर्याने सामोरे जाऊन आपण योग्य तो मार्ग स्वीकारायचा. आपण नक्की यशस्वी व आनंदी होतो असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी अनेक दाखले देऊन स्त्रियांनी सर्वप्रथम स्वतःच्या कर्तुत्वावर विश्वास ठेवावा; आपला आत्मविश्वास डगमगू नये. असे केल्यास आपले भविष्य उज्वल आहे असे मार्गदर्शन केले. अध्यक्ष स्थानावरून बोलत असताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी उपस्थित अभ्यागताना आपल्यासमोर उत्तुंग आकाश पसरलेले आहे त्यामध्ये तुम्ही तुमच्या कौशल्यानुसार यशस्वी व्हा असा मौलिक सल्ला दिला. या सत्रामध्ये आभार प्रदर्शन डॉ. सोनाली कुंभार यांनी केले.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये स्वागत, प्रास्ताविक व परिचय प्रा.सौ मनीषा पाटील यांनी केले. या सत्राच्या साधन व्यक्ती पंडित पिकलच्या यशस्वी उद्योजिका मा. सौ.अनुपमा मोरे यांनी कष्ट केल्यास नक्कीच यश मिळते असे प्रतिपादन केले. हे सांगत असताना स्वतःला आलेले अनुभव सांगितले. त्या पुढे म्हणाल्या की कठोर परिश्रम व उत्तुंग आत्मविश्वास यामुळे यश नक्कीच मिळते. यानंतर याच उद्योगाचे मार्केटिंग सेक्टर सांभाळणारे मा.श्री प्रमोद पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व्यवसायामध्ये अनेक आव्हाने असतात जसे की कच्चामाल, मार्केटिंग, रिझर्वेशन इत्यादी. अशा अनेक आव्हानांना सामोरे जात असताना आत्मविश्वासाने जर आपण पुढे जात गेलो तर नक्कीच यश मिळेल असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी आभार प्रदर्शन प्रा. सौ. प्रीतम गायकवाड यांनी केले. याप्रसंगी दूध साखर महाविद्यालय, बिद्री , देवचंद महाविद्यालय अर्जुननगर, कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी, यशवंतराव पाटील सायन्स कॉलेज सोळांकुर, डी. आर.माने महाविद्यालय कागल, व्यंकटराव कॉलेज आजरा येथील शिक्षक व विद्यार्थिनी हजर होत्या. तसेच सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मधील सर्व विद्यार्थिनी व शिक्षक स्टाफ हजर होता. सदर कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. सौ माणिक पाटील यांनी कार्य केले. तर सौ. माधुरी कुदळे, सौ प्रीतम गायकवाड, सौ अर्चना कांबळे, सौ मनीषा पाटील, डॉ. दिपाली सामंत, डॉ.सोनाली कुंभार, कु.स्नेहा हवालदार, प्रा. राजेंद्र पाटील, प्रा. श्री नितेश रायकर यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सौ अर्चना कांबळे व प्रा. कुमारी शिल्पा कुडवे यांनी केले.

# रसायनशास्त्र विभागाच्या वतीने पोस्टर प्रेझेंटेशन


रसायनशास्त्र विभागाच्या पोस्टर्सचे अवलोकन करताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, प्रा.डॉ. एम एस पाटील व इतर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयअंतर्गत सायन्स विभागाकडे रसायनशास्त्र विभागाच्या वतीने पोस्टर प्रेसेंटेशनचे आयोजनकरण्यात आले होते. यामध्ये बीएससी भाग एक,दोन व तीन च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.सुरुवातीस कार्यक्रमाचे उद्घाटन विविध केमिकल च्या सहाय्याने ध्वज निर्मिती करून झाले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. मयूर कांबळे यांनी केले. यानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत प्रा. हर्षदा पाटील व प्रा. वैशाली कांबळे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. यानंतर NAAC Co-Ordinator प्रा.डॉ.माणिक पाटील मॅडम, उपप्राचार्य प्रा.डॉ. एस बी पोवार सर, स्टाफ सेक्रेटरी प्रा.डी.ए.सरदेसाई सर यांनी मार्गदर्शन पर मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे सर यांनी रसायन शास्त्रातील आधुनिक तंत्रज्ञान, रसायनशास्त्राचा दैनंदिन जीवनातील योगदान यासंबंधी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास सायन्स विभागप्रमुख प्रा. सुरज मांगले,मायक्रोबायोलॉजी विभागाच्या प्रा.तेजस्विनी कांबळे,प्रा. समृद्धी मोरे, प्रा. अदिती बांबरे, प्राणीशास्त्र विभागाच्या प्रा. सोनाली बाबर, रसायनशास्त्र प्रयोगशाळा सहाय्यक मा.सतीश खराडे व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्यासंख्येने उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांचे आभार प्रा. वैशाली कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हर्षदा पाटील यांनी केले.

# प्रणाली कामिरकर हिची एसबीआय मध्ये क्लार्क पदी निवड






**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील कॉमर्स विभागाची विद्यार्थिनी कुमारी प्रणाली अमृत कामिरकर हिची स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ज्युनिअर असोसिएट (क्लार्क) पदी निवड झाली. एसबीआयची पूर्व परीक्षा २७ सप्टेंबर मध्ये घेण्यात आली होती. तर मुख्य परीक्षा २१ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेमध्ये कामिरकर या विद्यार्थिनीने यश संपादन केले. सध्या ती आयडीबीआय बँकेमध्ये कार्यरत आहे. तिच्या यशामागे तिचे वडील अमृत कामिरकर,भाऊ प्रणेश कामिरकर यांनी कष्ट घेतले.

तिला संस्थेचे सेक्रेटरी मा.खासदार संजयदादा मंडलिक, कार्याध्यक्ष विरेंद्र भैया मंडलिक, अध्यक्ष गजाननराव गंगापुरे, कार्यवाह मा.अण्णासाहेब थोरवत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, उपप्राचार्य डॉ.शिवाजी पोवार, कॉमर्स विभागाचे तत्कालीन विभाग प्रमुख डॉ. उदयकुमार शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

## संशोधन आणि उद्योगात सूक्ष्मजीवशास्त्राला मोठी संधी: प्रा.जे.ए.पाटील



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.जे.ए.पाटील, यावेळी उपस्थित प्रा.डॉ.माणिक पाटील, प्रा. तेजस्विनी कांबळे, प्रा. समृध्दी मोरे, प्रा. आदिती बांबरे, प्रा. वैशाली कांबळे व इतर.


**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र (Microbiology) विभागाच्या वतीने एकदिवसीय विशेष व्याख्यानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. जे. ए. पाटील (CSIR-NET), संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांची उपस्थिती लाभली. त्यांनी "सूक्ष्मजीवशास्त्रातील भविष्यकालीन संधी" या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर विद्यार्थ्यांना सखोल व मार्गदर्शक असे व्याख्यान दिले. त्यांनी सूक्ष्मजीवशास्त्रातील विविध करिअरच्या संधी, संशोधन क्षेत्रातील प्रगती, तसेच उद्योग क्षेत्रातील संधी याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरची दिशा ठरविण्यास मदत झाली.

या कार्यक्रमास NAAC समन्वयक डॉ.एम.एस.पाटील मॅडम यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा.ए.डी.बांबरे, प्रा.एस.पी.मोरे, रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा.एम.व्ही.कांबळे, प्रा.व्ही.एस.कांबळे तसेच बी.सी.ए.विभागातील शिल्पा कुडवे मॅडम यांनी देखील आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा.टी.आर.कांबळे यांनी केली. त्यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करत प्रमुख व्याख्या त्यांची ओळख करून दिली. व्याख्याना दरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला तसेच शेवटी प्रश्नोत्तरांच्या सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या शंका विचारल्या, ज्यांची उत्तरे प्रा. पाटील यांनी अत्यंत समर्पक पद्धतीने दिली.

## "सीमा प्रश्नामुळे माणूस माणसापासून दुरावत आहे" - डॉ. तेजस्विनी पाटील डांगे




**मुरगूड (वार्ताहर) :**

सीमा प्रश्नामुळे माणूस माणसापासून दुरावत आहे असे प्रतिपादन श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय इस्लामपूर मधील इंग्रजी विभागाच्या प्रमुख डॉ. सौ तेजस्विनी पाटील डांगे यांनी केले. त्या सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड मधील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इंग्रजी विभाग यांच्यामार्फत ग्लोबल फाउंडेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "बॉर्डर लिटरेचर :आयडेंटिटी, मायग्रेशन अँड कल्चरल हायब्रीडीटी" या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये बीजभाषक म्हणून बोलत होत्या. या परिषदेचे उद्घाटन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. कुंभार यांनी इंग्रजी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभाग यांचे परिषदेच्या आयोजना बद्दल कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी इंग्रजी विभागाच्या या उपक्रमाबाबत कौतुक व्यक्त केले ते म्हणाले की, सध्या सुरू असलेल्या जागतिक राजकारणाच्या पार्श्वभूमीवर या विषयावर अध्ययन व चर्चा करणे गरजेचे आहे.प्रारंभी स्वागत व प्रस्ताविक या परिषदेच्या संयोजक प्राध्यापक डॉ. सौ माणिक पाटील यांनी केले.

बीजभाषक म्हणून बोलत असताना डॉ.तेजस्विनी पाटील डांगे यांनी अभ्यागतांना बॉर्डर लिटरेचर बद्दल सांगोपांग माहिती दिली. त्या म्हणाल्या देश विदेशामध्ये अनेक ठिकाणी सीमा प्रश्न उपस्थित होत आहे त्यामध्ये भारत - पाकिस्तान, पाकिस्तान - बांगलादेश, कर्नाटक महाराष्ट्र असा सीमावाद निर्माण झाला. अशा सीमा वादातून अनेक प्रश्न निर्माण झाले यामुळे अनेक व्यक्तींना स्थलांतरित व्हावे लागले आणि याचा परिणाम लोकांच्या भाषेवर संस्कृतीवर तसेच मनावरही झाला. त्या म्हणाल्या की या सर्वांचा उल्लेख भाषिक साहित्यातून होत आहे.याप्रसंगी त्यांनी इंग्रजी वाङ्मयातील अनेक लेखकांचा, कवींचा तसेच समीक्षकांचा उल्लेख केला. या वाङ्मयामुळे आजच्या पिढीला सीमावाद व त्याचे चांगले वाईट परिणाम याबद्दल सखोल ज्ञान प्राप्त होत आहे असे त्या म्हणाल्या. यानंतर या सत्राचे अध्यक्ष स्थानावरून नाईट कॉलेज कोल्हापूरचे प्राचार्य डॉक्टर उत्तम पाटील यांनी इंग्रजी विभाग व महाविद्यालयाचे कौतुक केले की युद्धाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाने अशा विषयावर परिषद आयोजित केलेली आहे. ते म्हणाले की यावर चर्चा विमर्श होणे गरजेचे आहे.

या परिषदेच्या द्वितीय सत्रामध्ये गीतम युनिव्हर्सिटी, विशाखापट्टणम मधील इंग्रजी विभागाच्या डॉ. प्रोनिमा बागची यांनी , "Literature beyond borders - en route to becoming a multivocal entity and a celebration of liminality" या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलत असताना त्यांनी सीमा प्रश्नामुळे उद्भवलेल्या अनेक समस्या यांचे इंग्रजी वाङ्मयामध्ये ठिकठिकाणी झालेल्या उल्लेखांचा परिचय करून दिला. त्यांनी याप्रसंगी बहुभाषावाद आणि वांग्मय संकल्पना यांवर सीमा प्रश्नांमुळे निर्माण झालेले परिणाम याविषयी अनेक उदाहरणे दिले ज्यामध्ये त्यांनी पौराणिक उदाहरणापासून आधुनिक उदाहरणापर्यंत अनेक विविध दाखले दिले. त्या म्हणाल्या की सीमा प्रश्नांमुळे अनेक संस्कृतीमध्ये संकर निर्माण झालेला आहे संस्कृतींचा मिश्रण झालेले आहे भाषांचे मिश्रण झालेले आहे . या यानंतर या सत्रामध्ये महावीर महाविद्यालय कोल्हापूर मधील इंग्रजी भाषा विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर कल्पना गंगातीरकर यांनी अध्यक्ष स्थानावरून बोलत असताना सीमा वादामुळे आपल्या ओळखीचा ऱ्हास होतोय की काय अशी भीती व्यक्त केली. आभार प्रदर्शन इंग्रजी विभागाचे लेफ्टनंट विनोद कुमार प्रधान यांनी केले तर सूत्रसंचालन इंग्रजी विभागाच्या सौ सोनाली कुराडे यांनी केले.

## वाणिज्य विभागाची गोकुळ शिरगांव येथील औद्योगिक वसाहतीला भेट



गोकुळ दूध संघ भेटी प्रसंगी प्रा.राहुल बोटे, प्रा. संजय हेरवाडे, प्रा. सुशांत पाटील आणि कॉमर्स विभागाचे सर्व विद्यार्थी.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड येथील वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांची MIDC गोकुळ शिरगांव येथे अभ्यासक्रमांतर्गत औद्योगिक भेट पार पडली. पुस्तकी ज्ञानासोबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगात तेथील कर्मचारी कसे काम करतात, तसेच त्यांची हिशेबलेखनाची पद्धत कशी आहे याची माहिती व्हावी या उद्देशाने या औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते.

गोकुळ शिरगांव येथील कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) आणि या दोन उद्योगांना विद्यार्थ्यांनी भेट दिली आणि तेथील माहिती जाणून घेतली. या औद्योगिक भेटीमध्ये बी.कॉम भाग दोन व तीन मधील साठ विद्यार्थी - विद्यार्थिनी सहभागी झाले होते. तसेच प्रा. राहुल बोटे,प्रा. संजय हेरवाडे, प्रा. सुशांत पाटील यांनी या भेटीसाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांची प्रेरणा व सहकार्य मिळाले.

## जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त इंग्रजी कार्यशाळा व इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा संपन्न



विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करताना उपप्राचार्य प्रा.डॉ.शिवाजी पोवार, प्रा.डॉ.एम.एस.पाटील, प्रा. विनोदकुमार प्रधान व इतर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये जागतिक साक्षर दिनाच्या पार्श्वभूमीवर इंग्रजी विभागातर्फे बेसिक टेक्निक्स ऑफ रायटिंग इंग्लिश ही कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक लेफ्टनंट विनोदकुमार प्रधान यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी लिखाणातील विविध तंत्रांविषयी अवगत केले.

या कार्यशाळेचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांनी भूषवले. तर आय क्यू एसी समन्वयक प्रा.डॉ.सौ. माणिक पाटील या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यशाळेची सुरुवात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपप्राचार्य डॉ. पोवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. या कार्यशाळेपूर्वी दरवर्षीप्रमाणे इंग्रजी विभागाच्या वतीने जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त सुंदर इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा नुकतीच उत्साहात पार पडली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये हस्ताक्षर कलेसारख्या गुणांना वाव देण्यासाठी इंग्रजी विभागाचे लेफ्टनंट प्रा. विनोदकुमार प्रधान हे दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करत असतात. चालू वर्षी ही स्पर्धा महाविद्यालयापुरती मर्यादित न ठेवता आंतरमहाविद्यालयीन स्तरावर घेण्यात आली. यामध्ये डी आर माने महाविद्यालय कागल, देवचंद महाविद्यालय अर्जुन नगर सारख्या महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी हिरीरीने सहभाग घेतला. या स्पर्धेची ऑनलाईन व ऑफलाइन दोन्हीही पद्धतीने नोंदणी घेण्यात आली. सर्वच स्पर्धकांना स्पर्धा संपल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. आयोजकांनी घोषित केल्याप्रमाणे या स्पर्धेमधून तीन स्पर्धक विजेते ठरले. ते पुढीलप्रमाणे: प्रथम क्रमांक कु. सह्याद्री गणपती कमळकर (बीए भाग ३) देवचंद कॉलेज अर्जुन नगर,द्वितीय क्रमांक कुमारी वैष्णवी बाजीराव कुंभार (बी.कॉम भाग ३) सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड वतृतीय क्रमांक कु. श्रावणीका संतोष घोरपडे (बी.कॉम. भाग ३) डी. आर. माने महाविद्यालय, कागल.

सदर स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मधील हिंदी विभागाचे सहा. प्रा. डॉ. जयसिंग कांबळे, मराठी विभागाचे सहा. प्रा. डॉ. सुखदेव एकल व या स्पर्धेचे आयोजक इंग्रजी विभागाचे लेफ्टनंट प्रा. व्ही. ए. प्रधान यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांची प्रेरणा लाभली. महाविद्यालयाचा सर्व प्राध्यापक वृंद, महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी व एनसीसीचे सर्व कॅडेट्स यांची उपस्थिती लाभली. प्रा. सुहास विमल नामदेव गोरुले यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## कुसुमाग्रज हे एक मानवतावादी लेखक- प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ शिवाजी होडगे, उपस्थित उपप्राचार्य प्रा.डॉ.एस.बी.पोवार, कार्यालयीन अधीक्षक मा. एम.डी.भोई व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

कुसुमाग्रज हे एक मानवतावादी लेखक आहेत असे प्रतिपादन सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी केले. ते मराठी भाषा गौरव दिवस कार्यक्रमात बोलत होते. ते आपल्या मनोगतात पुढे म्हणाले की, कुसुमाग्रज यांनी कविता कादंबरी नाटक या प्रकारांमध्ये मानवी जीवनाविषयीच्या उदात्त भावना चित्रित केले आहेत. त्यामुळे कुसुमाग्रज हे भारतीय पातळीवरील महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांचे सर्व लेखन हे मानवी जीवनाला दिशा देणारे आहे. त्यांच्या कवितांमधून समता, बंधुता, स्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम तसेच मानवी जीवनातील मांगल्याचा विचार आलेला दिसून येतो.

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.शिवाजीराव पोवार प्रा. दीपक साळुंखे प्रा. राजेंद्र पाटील प्रा.मनीषा पाटील यांनी आपली मनोगत व्यक्त केली. या कार्यक्रमानिमित्त माझी स्वाक्षरी माझी ओळख व निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. माझी स्वाक्षरी माझी ओळख स्पर्धेत प्राध्यापकांमधून विजेतेअनुक्रमे :प्रथम- प्रा.संजय हल्लाप्पा हेरवाडे,द्वितीय- प्रा. अवधूत शिवाजी पाटील, तृतीय- प्रा.डॉ अशोक बाळू पाटील तर उत्तेजनार्थ श्रीमती अलका सुखदेव चौगले विद्यार्थ्यांमधून :प्रथम- कु. सायली उत्तम बारड, द्वितीय- कु.अनुराधा सदाशिव मोहिते, तृतीय- कु. प्रांजल नितीन हंकारे यांनी यश संपादन केले.

निबंध स्पर्धा प्रथम-उषा जाधव, द्वितीय विभागून-श्रावणी हळदकर, प्रणिती धनगर, तृतीय विभागून-प्रणाली भराडे,अक्षता खराडे, साऊताई कळमकर यांनी यश संपादन केले.महाविद्यालयातून मराठी विषयातून पदवी प्राप्त करून याच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झालेले डॉ. सुखदेव एकल, प्रा.आर.एस.पाटील तसेच प्रशासकीय सेवेत रुजू झालेले कार्यालयीन प्रमुख महादेव भाई, सतीश खराडे, सुमित जाधव, सुनील कडाकणे यांचाही प्राचार्यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थी सीमा सुरक्षा दलात अनिकेत विलास पाटील,विशाल रमेश प्रभावले, रोहन हरी कोंडेकर भरती झालेबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सुखदेव एकल यांनी केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. सोहम डाफळे,प्रा.दिगंबर गोरे, प्रा .धनाजी खतकर,लेफ्ट. प्रा. विनोदकुमार प्रधान,प्रा स्वप्निल मेंडके,प्रा.अवधूत पाटील,प्रा बाबुराव सारंग , प्रा.गोरे ,प्रा. नितेश रायकर, प्रा.राम पाटील,प्रा.राहुल बोटे, प्रा.संदीप मोहिते, प्रा. दिपाली सामंत, प्रा. अर्चना कांबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे तर आभार प्रा. टी.एच.सातपुते यांनी मानले. कार्यक्रमासाठी मराठी विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## बोली ह्या भाषेला समृध्द बनवतात - प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे




मराठी भाषा आणि बोली या भित्तीपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, प्रा.डॉ.एस.बी.पोवार, प्रा.डॉ.सुखदेव एकल, प्रा. राजेंद्र पाटील, प्रा.सोहम डाफळे.

**मुरगूड (वार्ताहर) :**

बोली ह्या भाषेला समृद्ध बनवतात असे प्रतिपादन सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. (डॉ.) शिवाजी होडगे यांनी केले. ते मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'मराठी भाषा आणि बोली' भित्तिपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. ते आपल्या मनोगतात पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात मराठीच्या अनेक बोलीभाषा बोलल्या जातात. या बोली त्या प्रदेशातील संस्कृती, समाजजीवन आणि परंपरेचा आरसा असतात. त्यामुळे बोलीचे जतन आणि संवर्धन करणे ही आजच्या काळात आपली जबाबदारी आहे. कोणतीही बोली ही शुद्ध अथवा अशुद्ध नसते. तिच्याकडे डोळसपणे पाहून आपण बोली टिकवल्या पाहिजेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सुखदेव एकल यांनी केले. हे भित्तिपत्रक बीए भाग एकच्या विद्यार्थ्यांनी कु. साऊताई कळमकर, मेघा कांबळे, प्रणाली भराडे यांनी संकलन आणि संपादन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. (डॉ.) शिवाजीराव पोवार, नॅक समन्वयक सौ.डॉ.माणिक पाटील,लेफ्ट. प्रा. विनोदकुमार प्रधान, स्टाफ सेक्रेटरी प्रा. दादासाहेब सरदेसाई, प्रा.एम. एच. सोहनी, प्रा.राम पाटील प्रा. सुहास गोरुले, प्रा. गुरुनाथ सामंत, प्रा. धनाजी खतकर, प्रा. दिपाली सामंत,प्रा. अर्चना कांबळे,प्रा. मनीषा सावेकर, प्रा.संदीप मोहिते उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.आर. एस. पाटील तर आभार प्रा. सोहम डाफळे यांनी मानले.

## एन.एस.एस.चे विशेष श्रमसंस्कार शिबिर हळदी येथे उत्साहात संपन्न



हळदी, ता. कागल येथे एनएसएस विभागामार्फत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करताना विद्यमान सरपंच सौ. संपदा दीपक कुंभार, कार्यवाह मा. अण्णासो थोरवत, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, माजी सरपंच बाबासो पाटील, प्रा. शिवाजी टेंबुगडे, प्रा. दीपक साळुंखे, प्रा. दिगंबर गोरे, प्रा. संजय हेरवाडे, प्रा. सुशांत पाटील, प्रा. रामचंद्र पाटील

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने “युवकांसाठी शाश्वत विकास” या ब्रीदवाक्याखाली आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर दि. १० ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत मौजे हळदी (ता. कागल) येथे उत्साह, शिस्त आणि सेवाभावाच्या वातावरणात यशस्वीपणे पार पडले. स्वयंसेवकांच्या अथक परिश्रमामुळे आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हळदी गावात सामाजिक परिवर्तनाची नवी चाहूल लागल्याचे चित्र या शिबिरातून पाहायला मिळाले. सात दिवसांच्या या निवासी शिबिरात स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन, श्रमदान, शोषखड्डे निर्मिती, पानंद रस्त्यांची प्राथमिक दुरुस्ती, आरोग्य तपासणी, पशुवैद्यकीय उपचार, जनजागृती रॅली, सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण तसेच महिला सबलीकरणासाठी हळदी-कुंकू कार्यक्रम अशा बहुआयामी उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली. गावाच्या कानाकोपऱ्यात श्रमप्रतिष्ठेचा संदेश पोहोचवत स्वयंसेवकांनी “सेवा हीच साधना” या विचाराचा प्रत्यय घडवून दिला. शिबिराचे उद्घाटन सरपंच मा. सौ. संपदा दीपक कुंभार यांच्या हस्ते झाले. शिबिरातील विविध उपक्रम आणि व्याख्यानांचा स्वयंसेवक विद्यार्थी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, “श्रमसंस्कारातून मिळणारे मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आयुष्यभर दिशा देणारे ठरते.” विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, समर्पण, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव दृढ करण्यासाठी अशा शिबिरांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

शिबिरातील प्रत्येक दिवस योगशिक्षण, प्रार्थना आणि चिंतनाने सुरू होत असल्याने स्वयंसेवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाला. आयोजित व्याख्यानमालेत डॉ. अर्जुन कुंभार यांनी शाश्वत विकासाची आवश्यकता स्पष्ट करत पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला. डॉ. राजू धनगर यांनी पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मजबूत आधारस्तंभ असल्याचे प्रभावीपणे मांडले. प्राचार्य डॉ. ए. डी. जोशी यांनी एनएसएसच्या माध्यमातून राष्ट्रभान जागवणारी युवकांची पिढी घडेल, असा विश्वास व्यक्त केला. डॉ. शत्रुघ्न जाधव यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून दिले. प्रा. नितेश रायकर महाराज यांच्या ओजस्वी कीर्तनाने परिसर विठ्ठलनामाच्या गजराने भारावून गेला.

राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर हे केवळ श्रमदान किंवा सामाजिक कार्यापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी व्यासपीठ आहे. याच उद्देशाने स्वयंसेवकांच्या अंगी दडलेल्या विविध कलागुणांना वाव मिळावा, त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा आणि सर्जनशीलतेला चालना मिळावी यासाठी प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार, मा. बाबासो पाटील,मा बाबुराव बारड, मा. तानाजी तिकोडे, मा यासीन पटेल,मा. शिवाजी टेंबुगडे,मा हनुमंत कुंभार,मा मनोहर सुतार, भीमराव कुणकेकर, मा शरद मोरे,मा शिवाजी चव्हाण ,मा दिनकर कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरातील उल्लेखनीय कार्याबद्दल कु. प्रथमेश एरुडकर (एनएसएस स्पेशल अवॉर्ड), कु. रोहन मोरे (बेस्ट व्हॉलेंटियर – बॉय) आणि कु. अनुराधा मोहिते (बेस्ट व्हॉलेंटियर – गर्ल) यांचा सन्मान करण्यात आला. स्वयंसेवक कु. मधुरा जाधव, कु. प्रथमेश येरुडकर, कु. स्वाती मगदूम,कु. नयन मोरे, कु. वैष्णवी कुंभार व कु. निलेश पाटोळे यांनी मनोगत व्यक्त करताना शिबिराने आयुष्याला नवी दिशा दिल्याची भावना व्यक्त केली. शिबिराचे नियोजन व संयोजन कार्यक्रमाधिकारी प्रा. दीपक साळुंखे, प्रा. संजय हेरवाडे, प्रा. दिगंबर गोरे, प्रा. सुशांत पाटील, प्रा. संदीप मोहिते, प्रा. रामचंद्र पाटील, प्रा. स्वप्निल मेंडके, प्रा. राहुल बोटे, प्रा. सोहम डफळे, प्रा. समृद्धी मोरे व प्रा. शितल मोरबाळे यांनी यशस्वीपणे केले.

सदर शिबिराच्या यशस्वीतेमागे संस्थेचे सेक्रेटरी मा. खासदार संजयदादा मंडलिक व कार्याध्यक्ष मा. ॲड. विरेंद्र मंडलिक, अध्यक्ष गजाननराव गंगापुरे, प्रा.डॉ.शिवाजी होडगे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले. श्रमप्रतिष्ठा, सेवाभाव, त्याग आणि सामाजिक बांधिलकीचा प्रभावी संदेश देणारे हे शिबिर हळदी गावाच्या स्मरणपटलावर दीर्घकाळ कोरले गेले.

## 'अभिरूप युवा संसद' स्पर्धेमध्येमंडलिक महाविद्यालयाला मानाचे तिसरे स्थान



पारितोषिक वितरण प्रसंगी महाविद्यालयाचा सर्व संघ. यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ.जी.डी.इंगळे, सोबत संघ व्यवस्थापक प्रा.डी.व्ही.गोरे, प्रा. सुशांत पाटील, प्रा. शितल मोरबाळे, प्रा. संजय हेरवाडे उपस्थित मान्यवर व परीक्षक.

**मुरगूड (वार्ताहर) :**

देवचंद कॉलेज,अर्जुननगर येथे पार पडलेल्या युवक बिरादरी,भारत यांच्यावतीने आयोजित अभिरूप युवा संसद स्पर्धेमध्ये कोल्हापूर विभागीय पातळीवर सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने मानाचे तृतीय स्थान पटकावले. देशातील आजचा युवक हा उद्याच्या भारताचे नेतृत्व करणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि राजकीय भान विकसित होण्याकरिता सदर उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित होते.

या स्पर्धेत विविध महाविद्यालयाच्या संघांनी सहभाग नोंदवला. संसदेच्या नियमित कामकाजातील शपथविधी, शोक ठराव, प्रश्नोत्तराचा तास, विधेयक सादरीकरण अशा सर्व बाबी पार पाडताना विद्यार्थ्यांची कसोटी पाहायला मिळाली. यामध्ये सभापती कु. दिव्या कळमकर, प्रधानमंत्री कु.निलेश पाटोळे व विरोधी पक्षनेते कु. विशाल कांबळे यांनी विशेष भूमिका पार पाडली. संसद सचिव व मार्शल म्हणून अनुक्रमे कु.आदर्श जाधव व महेश सुतार यांनी भूमिका बजावली. यावेळी सत्ताधारी पक्षाच्या बाजूने कु.प्रथमेश एरुडकर,प्राची कळमकर,सानिका रणदिवे,पूजा माने,साक्षी पोवार,प्राची फराकटे तर विरोधी पक्षाच्या बाजूने कु.आरती गिरीबुवा,प्रतिक्षा परीट, प्रज्ञा कुंभार,गौरी परीट यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या एकूण १५ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता.

या चुरशीच्या स्पर्धेत सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने प्रभावी कामगिरी करत तृतीय स्थान पटकावले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रश्नोत्तरांच्या प्रभावी मांडणीला परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली. महाविद्यालयाच्या पथकातील प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मविश्वास दाखवत उत्कृष्ट कामगिरी बजावली. संघ समन्वयक म्हणून प्रा.डी.व्ही.गोरे, प्रा.सुशांत पाटील, प्रा. शितल मोरबाळे, प्रा.संजय हेरवाडे यांनी भूमिका पार पाडली. याप्रसंगी देवचंद कॉलेजच्या प्राचार्य प्रा.डॉ.जी.डी.इंगळे, प्रमुख अतिथी म्हणून लोकमतचे संपादक डॉ.वसंत भोसले तसेच युवक बिरादरीचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. परीक्षक म्हणून प्रा.राम शिंदे आणि प्रा.प्रल्हाद माने यांनी काम पाहिले. यावेळी विजेत्या संघांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्या या यशासाठी संस्थेचे सेक्रेटरी मा. खासदार प्रा.संजयदादा मंडलिक, अध्यक्ष मा.गजाननराव गंगापुरे, कार्याध्यक्ष ॲड. विरेंद्र मंडलिक, कार्यवाह मा.अण्णासाहेब थोरवत आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार व सर्व प्राध्यापक यांचे सहकार्य व प्रोत्साहन लाभले.

## महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन दिमाखात संपन्न



वार्षिक स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी कार्यवाह मा. अण्णासाहेब थोरवत, प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. दीपक साळुंखे, प्रा.डॉ.एम.एस.पाटील व इतर मान्यवर.

**मुरगूड (वार्ताहर) :**

वार्षिक स्नेह संमेलनासाठी आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन मा.श्री अण्णासाहेब थोरवत यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कला गुणांचे प्रदर्शन केले. या संमेलनामध्ये रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, केशरचना स्पर्धा, पारंपरिक दिन तसेच मुख्य कार्यक्रमामध्ये विविध नृत्ये, गायन, नाटय इत्यादी कला सादर केल्या.

पारंपारिक दिन विजेते जय मल्हार ग्रुप- प्रथम क्रमांक, श्रीगणेश गुरव ग्रुप(वासुदेवाची स्वारी)- द्वितीय क्रमांक, प्राची फराकटे व वैष्णवी कुंभार(मराठी संस्कृती)- तृतीय क्रमांक, पारंपरिक दिन विशेष सहभाग (प्रा.दीपक साळुंखे यांच्याकडून) प्रा.डॉ. अशोक पाटील, प्रा. अश्विनी गुजर केशरचना स्पर्धा विजेते संजीवनी प्रकाश गोंधळी (B.C.A.-III)- प्रथम क्रमांक, मलप्रभा कुबेर निलस्कर, स्वाती बापूसो मगदूम (B.A.-III)- द्वितीय क्रमांक (विभागून), अंकिता एकनाथ पाटील (B.A.-I)- तृतीय क्रमांक, रांगोळी स्पर्धा विजेते स्वाती बापूसो मगदूम (B.A.-III)- प्रथम क्रमांक, श्वेता प्रकाश पाटील (B.A-III)- द्वितीय क्रमांक, प्रतीक्षा राजेंद्र परीट (B.Sc.-III)- तृतीय क्रमांक, सारिका पांडुरंग पाटील (B.Com.-II)- उत्तेजनार्थ, संजीवनी गोंधळी (B.C.A-III)- उत्तेजनार्थ

मेहंदी स्पर्धा विजेते साक्षी संजय पाटील (B.C.A.-III)- प्रथम क्रमांक, सानिका विक्रम खतकर (B.Sc.-III) सोनाली संजय शिंदे (B.C.A-III)-द्वितीय क्रमांक (विभागून), प्रतीक्षा राजेंद्र परीट (B.Sc.-III)- तृतीय क्रमांक, सारिका पांडुरंग पाटील (B.Com-II)- उत्तेजनार्थ, नेहा सुधीर आंबले (B.C.A.-III)- उत्तेजनार्थ,

रेट्रो लुक विजेते श्रीगणेश गुरव (B.A.-II)- प्रथम क्रमांक, प्रतीक्षा परीट (B.Sc.-III) -द्वितीय क्रमांक, संदेश सोनाळकर व हर्षद कांबळे (B.C.A-III)- तृतीय क्रमांक, प्रज्ञा कुंभार (B.A.-III) व धनश्री मगदूम (B.C.A-III)- उत्तेजनार्थ, प्रा. कु. स्नेहा हवालदार (B.C.A विभाग)- उत्तेजनार्थ, ट्विन्स लुक पद्मजा राऊत, उत्कर्षा पाटील (B.Com.-III)- प्रथम क्रमांक, वैष्णवी कुंभार, प्राची फराकटे (B.Com.-III)- द्वितीय क्रमांक, आरती गिरीबुवा (B.A.-III), वैष्णवी कुंभार (B.Com.-III)- तृतीय क्रमांक, दांडिया स्पर्धा विजेते युथ ग्रुप- प्रथम क्रमांक, (संदेश सोनाळकर, संयोगिता फगडे, शुभम कांबळे, आदित्य तहसीलदार,पायल डवरी, तेजस्विनी भारमल, प्रतिक्षा परीट,सुहाना कांबळे, ज्ञानेश्वरी सुतार, श्रीगणेश गुरव), शिवकन्या ग्रुप- द्वितीय क्रमांक, (प्रज्ञा विष्णू कुंभार, आरती गिरीबुवा, वैष्णवी कुंभार, तेजस्विनी एकल, दिव्या कळमकर, अंकिता पोवार, सानिका रणदिवे), राधाकृष्ण ग्रुप- तृतीय क्रमांक (प्राची कळमकर, रोहन मोरे, पूजा माने, राम वांगळे, पूजा राऊत, समृद्धी गोधडे)

## आंतरविद्याशाखीय अभ्यासातून सामाजिक प्रश्नांची सखोल उकल : प्रा.डॉ. गोपाळ गुरु



आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये बीजभाषण करताना जे.एन.यू विद्यापीठ दिल्लीचे प्रा. डॉ. गोपाळ गुरु व्यासपीठावर डॉ. जयंत कळके प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे प्राचार्य डॉ .संजय पाटील डॉ.संजय कोळेकर( पुणे ), प्रा.डॉ.शिवाजी पोवार.

**मुरगूड (वार्ताहर) :**

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड येथे आयोजित केलेल्या सामाजिक शास्त्रातील आधुनिक प्रवाह, संशोधनातील नव्या दिशा व बहुविद्याशाखीय दृष्टिकोन या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे बिजभाषण करताना जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली चे प्रा. डॉ. गोपाळ गुरु यांनी सामाजिक शास्त्रातील आधुनिक दृष्टिकोन, बहुविषयक अभ्यासाचे महत्त्व व समाजाच्या समग्र अभ्यासासाठी विविध विषयांचा समन्वय आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासातून सामाजिक प्रश्नांची सखोल उकल करणे शक्य आहे असे प्रतिपादन केले. या परिषदेचे उद्घाटन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व भारतीय शिक्षण संस्था पुणे चे सेक्रेटरी डॉ. जयंत कळके व मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे होते. उद्घाटन प्रसंगी डॉ. जयंत कळके म्हणाले की सामाजिक शास्त्र हे अतिशय महत्वाचे आहे, आणि त्याचा आधुनिक दृष्टिकोनातून अभ्यास होने गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणात बोलताना प्रा. डॉ. शिवाजी होडगे यांनी संशोधनातील गुणवत्ता, शैक्षणिक मूल्ये व संशोधकांची सामाजिक जबाबदारी यावर भर दिला पाहिजे असे सांगितले.

उद्घाटन सत्रानंतर प्रथम सत्रात बोलताना श्रीलंका विद्यापीठाचे प्रा. डॉ. निशान सकलसुरीया यांनी आंतरराष्ट्रीय भौगोलिक विचारसरणी पुढील आव्हाने या विषयावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी जागतिक पातळीवरील सामाजिक परिवर्तन, आंतरराष्ट्रीय संशोधनाची दिशा व सांस्कृतिक विविधता यावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. या सत्राच्या अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी जागतिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर भौगोलिक विचारसरणीचे महत्त्व स्पष्ट केले.

द्वितीय सत्रात महावीर महाविद्यालय, कोल्हापूरचे प्रा. डॉ. शिरीष शितोळे यांनी आधुनिक काळातील समाजशास्त्र आणि ए.आय. तंत्रज्ञानातील समाजशास्त्राची भूमिका यावर मार्गदर्शन केले. समाजशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा परस्परसंबंध त्यांनी उदाहरणांसह मांडला. या सत्राच्या अध्यक्षीय भाषणात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा. डॉ. संजय कोळेकर यांनी समाजशास्त्राबाबत आपले विचार व्यक्त करत भाषा, मानसशास्त्र, रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र या विविध विषयांमध्ये समाजशास्त्र कसे उपयुक्त ठरते, हे प्रभावीपणे समजावून सांगितले.

तिसऱ्या सत्रात विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील अभ्यागत संशोधकांनी आपले संशोधन पेपर सादर केले. सदर परिषदेमध्ये १४० संशोधन लेख सादर झाले होते त्यापैकी निवडक लेखांचे वाचन करून संशोधनविषयक चर्चा व विचारमंथन घडून आले.शेवटच्या सत्रात संस्थेचे कार्यवाह मा. आण्णासो थोरवत यांनी परिषद यशस्वी केल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रतिनिधिक स्वरूपात अभ्यागत संशोधकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक प्रा. दादासाहेब सरदेसाई यांनी केले.उद्घाटन सत्राचे आभार उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवाजीराव पोवार यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेफ्ट. प्रा. विनोद प्रधान, प्रा. संजय हेरवाडे, प्रा. मनीषा पाटील व प्रा. अर्चना कांबळे यांनी संयुक्तपणे प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या शेवटी नॅक समन्वयक व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रा. डॉ. माणिक पाटील यांनी उपस्थित मान्यवर, वक्ते, संशोधक व आयोजकांचे आभार मानले. या परिषदेसाठी संस्थेचे सेक्रेटरी मा.खासदार प्रा. संजयदादा मंडलिक, कार्याध्यक्ष मा. ॲड. विरेंद्र मंडलिक आणि अध्यक्ष मा. गजाननराव गंगापुरे व कार्यवाह मा. आण्णासो थोरवत यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

परिषदेचे आयोजन प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले, तसेच परिषदेचे नियोजन नॅक समन्वयक प्रा. डॉ. माणिक पाटील यांनी केले. convenor म्हणून प्रा. सरदेसाई यांनी तसेच समन्वयक म्हणून प्रा. दीपक साळुंखे यांनी काम पाहिले. परिषदेसाठी co- convenorम्हणून प्रा. गुरुनाथ सामंत आणि प्रा. दीपाली सामंत यांनी काम पाहिले.तंत्रज्ञान सल्लगार म्हणून प्रा. विनायक माने यांचे सहकार्य लाभले. परिषद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, उपप्राचार्य शिवाजीराव पोवार, प्रा. आरती पाटील, प्रा. दिगंबर गोरे, प्रा.सुशांत पाटील, प्रा. रामचन्द्र पाटील, प्रा. सुहास गोरुले, प्रा. मनीषा पाटील, प्रा.सोनाली कुंभार तसेच महाविद्यालयाचे इतर सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. हे चर्चासत्र सामाजिक शास्त्रातील आधुनिक व बहुविषयक अभ्यासाची नवी दिशा देणारे ठरले असून विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरले.